राज्य योजना सन २०१९-२०२०
वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना या योजनेचा
(२४०६-२२३२) चालू बाब प्रस्ताव.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः डब्ल्यूएलपी-०४.१९/प्र.क्र.१३७ /फ-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०२ ऑगस्ट, २०१९

वाचा :-

१. वित्त विभागाचे, शासन परिपत्रक, क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९.
२. शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०४१९/प्र.क्र.१३७/फ-१, दिनांक ०३.०५.२०१९.
३. शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०४१९/प्र.क्र.१३७/फ-१, दिनांक २९.०५.२०१९.
४. शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०४१९/प्र.क्र.१३७/फ-१, दिनांक १५.०६.२०१९.
५. शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०४१९/प्र.क्र.१३७/फ-१, दिनांक २४.०६.२०१९.
६. वित्त विभागाचे, शासन परिपत्रक, क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०८.०७.२०१९.
७. शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०४१९/प्र.क्र.१३७/फ-१, दिनांक २९.०७.२०१९.
८. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.२८/(१९-२०)/४२५, दिनांक :- १९.०६.२०१९.

प्रस्तावना :-

सन २०१९-२०२० मध्ये राज्यस्तरीय योजनेतंर्गत वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना (२४०६-२२३२) या लेखाशिर्षांतर्गत रुपये २२००.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

२. संदर्भ क्रमांक ४ च्या परिपत्रकात **"सन २०१९-२०२० च्या अर्थसंकल्पीय तरतूदींची मासिक निधी विवरणपत्रे अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) प्रशासकीय विभागाकडून नोंदविण्यात आल्यानंतर सन २०१९-२०२० च्या प्रथम नऊमाहीकरीता (डिसेंबर, २०१९ अखरे) आवश्यक असणारा अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत खर्चाचा अर्थसंकल्पीत निधी एकूण वार्षिक तरतूदीच्या ६० टक्केच्या मर्यादेत अर्थसंकल्पीय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) वितरीत केला जाईल."** असे नमूद करण्यात आले आहे.

३. वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना (२४०६-२२३२) या लेखाशिर्षाअंतर्गत वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक १ च्या परिपत्रकानुसार आतापर्यत उपरोक्त लेखशिर्षाअंतर्गत संदर्भ क्रमांक २, ३, ४, ५ व ७ च्या शासन निर्णयान्वये रु. १५०.२७ लक्ष निधी वितरीत करण्यात आला असून वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक ६ च्या परिपत्रकानुसार वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना (२४०६-२२३२) या लेखाशिर्षाअंतर्गत आता वितरणासाठी रु. ११६९.७३ लक्ष निधी शिल्लक आहे.

शासन निर्णय :-

प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्रमांक ८ च्या पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव व वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना (२४०६-२२३२) या योजनांतर्गत उपलब्ध निधीच्या अनुषंगाने सदर शासन निर्णयान्वये खालील अटींच्या अधीन राहून सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार रु. ११६९.७३ लक्ष निधीच्या प्रस्तावास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

I. सदर निधीसाठी नियंत्रण अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांचेकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. त्यांनी चा योजनेअंतर्गत घावयाच्या कामांची अंमलबजावणी, कृती आराखड्याप्रामाणे, विहीत कार्यपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सुचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना द्याव्यात आणि

अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रण अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

II. प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सोबत जोडलेल्या तक्यातील कार्यबाबींची आवश्यकता व निकडीचा विचार करुन संदर्भ क्रमांक ८ च्या पत्रान्वये वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना (२४०६-२२३२) या योजनेंतर्गत सादर केलेल्या प्रस्तावांकरिता आपले स्तरावरुन निधी वितरीत करावा.

III. सदर योजनेवर होणारा खर्च सन २०१९-२० मध्ये लेखा शिर्ष क्रमांक २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ०२ पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीव, पंचवार्षिक योजनाअंतर्गत, राज्य योजनांतर्गत योजना (००) (१०) वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना (२४०६-२२३२) अंतर्गत उद्दिष्टनिहाय, अर्थसंकल्प वितरण प्रणालीव्दारे प्राप्त होणाऱ्या निधीतून करण्यात यावा.

IV. योजनांतर्गत प्रस्तावीत कार्यबाबींना आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे याची खातरजमा झाल्यानंतरच सदर कार्यबाबींवर निधी खर्ची टाकण्यात यावा. सदर कामे करताना भारतीय वन अधिनियम, १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ व वन (संवर्धन) अधिनियम १९८० तसेच राष्ट्रीय प्राणी संग्रहायलयाच्या मार्गदर्शक तत्वांचा भंग होणार नाही व आवश्यक ती परवानगी घेतली गेली आहे ह्याची दक्षता घ्यावी.

V. प्रस्तावात नमूद ज्या कामांना सक्षम प्राधिकाऱ्यांची प्रशासकीय मंजूरी मिळाली आहे त्यावरच वितरीत अनुदान खर्च होईल याची खातरजमा करण्यात यावी.

VI. वितरीत केलेला निधी शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेस विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून, प्रचलित धोरण व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

VII. प्रस्तावित असलेल्या बांधकामासाठी शासनाने दिलेल्या सूचना आणि विहीत केलेली कार्यपद्धती अनुसरण्याची संबंधीत नियंत्रक/अंमलबजावणी अधिकारी यांची राहील. कोणत्याही प्रकारची वित्तीय अनियमितता होऊ न देण्याचीही जबाबदारी त्यांची असेल.

VIII. कार्यबाबींमध्ये साहित्य खरेदीचा समावेश असल्यास शासनाने विहित केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन खरेदी करण्यात यावी.

IX. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शक सूचनांचे व वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र. ३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक :- १७.०४.२०१५, क्रमांक :- अर्थसं-२०१९/ प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९ व दिनांक :- ०८.०७.२०१९ च्या परिपत्रकाचे काटेकोर पालन करावे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९ व दिनांक ०८.०७.२०१९ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०२१५००४९६६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL DESHBHRATAR

Digitally signed by SWAPNIL DESHBHRATAR
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c7928e692d77c386,
postalCode=400037, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=ce420aedd83773a67f861ab4c751835b3c5119f8fc41f2f3aa39bd7749dc02e0, ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL DESHBHRATAR
Date: 2019.08.02 15:09:49 +05'30'

(स्वप्निल देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे.
५. महालेखापाल१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखापरिक्षण), मुंबई/नागपूर.
६. ब-१, फ-२,फ-१ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

****

महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- डब्ल्यूएलपी ०४.१९/प्र.क्र. १३७/फ-१,
दिनांक :- ०२.०८.२०१९ सोबतचे प्रपत्र.

अ.क्र.	कामाचा तपशिल	रक्कम (रु. लाखात)
१	वन्यप्राणी उपचार केंद्राअंतर्गत रस्ते, संरक्षण भिंत व इतर सुविधा निर्माण	६४९.३३
२	वन्यप्राणी उपचार केंद्राअंतर्गत हरिणांकरीता प्राणिघर	३२६.०५
३	पशुचिकित्सालय	१९४.३५
	एकूण	**११६९.७३**

****